दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com
# सूर्योदय
Email : suryodaykokan.123@gmail.com
मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)




कोकण || वर्ष २ रे || अंक २२८ || शनिवार ०३ ऑगस्ट २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## चिपळूण मध्ये घुमला हम सब एकचा नारा..चिपळूण बाजारपेठ बंद...

चिपळूण प्रतिनिधी

गेल्या काही दिवसापूर्वी उरण येथील तरुणी यशश्री शिंदे हिची अत्यंत निर्घुण



पद्धतीने हत्या करण्यात आली .यात खूनाची विकृत मानसिकता दिसून येते .त्याला कडक शासन होण्यासंदर्भात सरकारने योग्य पाठपुरावा करावा.त्याचप्रमाणे यशश्री शिंदेच्या हत्ये विरोधात निषेध म्हणून चिपळूण येथे मोर्चा काढण्यात आला होता. त्यावेळेस चिपळूण येथील एका महिला भगिनीने अत्यंत अश्लील आणि अर्वाच्य भाषेत दोन धर्मामध्ये तेढ निर्माण होऊन सामाजिक सलोखा बिघडेल असे वक्तव्य केले होते. एवढचा जनसमुदायासमोर एका महिलेने येऊन अशा पद्धतीने जे वक्तव्य केले त्या घटनेमागे इतर काही शक्ती कार्यरत आहेत का ?याचा पोलीस प्रशासनाने कसून शोध घ्यावा, त्याचप्रमाणे काही दिवसापूर्वी एका मंदिरातील पुजाऱ्यांकडून महिलेवरती अमानुष अत्याचार झाले. त्या नराधमांना कठोर शासन होऊन त्या तरुणीला योग्य न्याय मिळावा अशी सरकारकडे मागणी करत आहोत.असे निवेदन चिपळूण व्यापारी महासंघटना यांच्यावतीने रॅली काढून प्रांत आणि डी वाय एस पी यांना निवेदन दिले.

## नव्या संसद भवनाला पहिल्याच पावसात गळती

**नवी दिल्ली :** जेमतेम वर्षभरापूर्वी बांधून पूर्ण झालेल्या नव्या संसद भवनाला गळती लागली आहे. बुधवारी झालेल्या पावसामध्ये खासदारांच्या एका लॉबीत छतातून पाणी टपकू लागल्याने तेथे बादली ठेवण्याची वेळ आली. ही चित्रफीत काँग्रेसचे खासदार मणिकम टागोर यांनी 'एक्स'वर टाकल्यामुळे या मुद्द्याला तोंड फुटले. त्यामुळे आता सुमारे एक हजार कोटी रुपये खर्चून बांधलेल्या इमारतीच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. संसद भवनातील गळतीबाबत टागोर यांनी गुरुवारी स्थगन प्रस्ताव दिला. संसदेबाहेर पेपरफुटी आणि संसदेच्या आता पाण्याची गळती, अशी टोकदार टीका त्यांनी केली. पाण्याची गळती झालेल्या लॉबीचा विद्यमान राष्ट्रपतींनी वापर केला होता. ही इमारत बांधून फक्त एक वर्ष झाले असताना पाण्याची गळती कशी होऊ शकते? या इमारतीच्या टिकाबूपणाचा मुद्दा गंभीर असून त्यावर तातडीने तोडगा काढला पाहिजे, असेही टागोर यांनी एक्सवरील संदेशात लिहिले आहे. नव्या इमारतीची सखोल पाहणी करण्याची गरज असून त्यासाठी



सर्वपक्षीय समिती नेमण्याची मागणीही त्यांनी केली.

बुधवारी संध्याकाळी झालेल्या मुसळधार पावसामुळे इमारतीचे मुख्यद्वार असलेल्या मकरद्वारासमोर मोठ्या प्रमाणावर पाणीही साठले. १२०० कोटींच्या इमारतीला १२० रुपयांच्या बादलीचा आधार, अशी मार्मिक टिप्पणी आम आदमी पक्षाने केली. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी नव्या इमारतीच्या बांधकामामध्ये भ्रष्टाचार झाल्याचा अप्रत्यक्ष आरोप केला. अयोध्येमध्ये राम मंदिराला गळती लागली आता नव्या संसदभवनातही गळती होत असून मोदी-शहांच्या ठेकेदारींनी ही वास्तू निर्माण केली असून ती खचू लागली आहे. सेंट्रल व्हिस्टा प्रकल्पामध्ये लाचखोरी झाली आहे. ठेकेदारांच्या माध्यमातून निवडणुकांसाठी पैसे गोळा केले जात आहेत,

अशी टीका शिवसेनेच्या ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केली. संसदेची नवी इमारत पर्यावरणस्नेही असल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र निसर्गाचे तिच्यावर इतके प्रेम असेल असे वाटले नव्हते, अशी टीका काँग्रेस खासदार रणदीप सुरजेवाला यांनी केली.

**समस्या सोडविल्याचा दावा**

पाणीगळती थांबली असून समस्येवर उपाय करण्यात आल्याचे स्पष्टीकरण लोकसभा सचिवालयाकडून देण्यात आले. हरित संसदेची संकल्पना लक्षात घेऊन इमारतीच्या लॉबीसह अनेक भागांमध्ये काचेचे घुमट बसवण्यात आले आहे. या घुमटांमुळे मुबलक नैसर्गिक प्रकाशाचा वापर दैनंदिन कामात करता येतो. बुधवारी झालेल्या मुसळधार पावसात इमारतीच्या लॉबीवरील काचेचे घुमट घट्ट बसावे यासाठी वापरण्यात आलेले एडेसिव्ह निघाले होते. त्यामुळे पाण्याची किरकोळ गळती झाली. घुमटाची दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच मकरद्वारासमोरील साचलेल्या पाण्याचाही निचरा झाल्याचे सचिवालयाकडून सांगण्यात आले

## कल्याणमध्ये घाटकोपरची पुनरावृत्ती! होर्डिंग कोसळल्याने दोघे जखमी

कल्याण : मे महिन्यात मुंबईत झालेल्या अवकाळी पावसामुळे घाटकोपरमध्ये मोठी दुर्घटना घडली. सहजानंद चौकात होर्डिंग कोसळून मोठा अपघात झाला. या घटनेत दोन जण जखमी झाले आहेत, तर



भलंमोठं होर्डिंग वादळी वाऱ्यामुळे कोसळलं व १७ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला तर ७० हून अधिक लोक जखमी झाले. याच घटनेची कल्याणमध्ये पुनरावृत्ती झाली आहे. मात्र, सुदैवाने मोठी जीवितहानी होता होता टळली आहे. कल्याणच्या अनेक गाड्यांचं नुकसान झालं आहे.

सहजानंद चौक हा कल्याण शहरातला गजबजलेला चौक आहे. या चौकात ऐन गर्दीच्या वेळी भलं मोठं होर्डिंग कोसळून अपघात झाला. यामुळे मोठी वाहतूक कोंडी झाली होती. या रस्त्याच्या एका बाजूला अनेक दुकानं तर दुसऱ्या बाजूला एक रुग्णालय आहे. या दुर्घटनेत जखमी झालेल्या दोघांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. पोलीस घटनास्थळी आले असून होर्डिंग हटवण्यासाठी अग्निशमन दलाचं पथकही आलं आहे.

होर्डिंगखाली ४ ते ५ गाड्या अडकल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. अग्निशामक दलाची टीम घटनास्थळी दाखल झाली असून बचाव कार्य सुरु आहे. गेल्या काही दिवसांपासून होर्डिंगचा प्रश्न ऐरणीवर आला होता. कोसळलेल्या होर्डिंला पालिका अधिकाऱ्यांकडून परवानगी दिल्याची माहिती मिळत आहे. पण पुन्हा तशीच घटना कल्याणमध्ये घडल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

## परिसर भाषेत शिक्षण असावे इंग्रजी शाळांचा अट्टाहास नको – प्रसिद्ध अभिनेते सुमीत राघवन

दापोली (प्रशांत परांजपे):- दापोली तालुक्यातील लोकमान्य पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट (लोकसाधना) या संस्थेच्या ४२ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने ते चिखलगाव येथे व्यासपीठावरून बोलत होते. ते पुढे म्हणाले की, आपल्याला सतत काहीतरी नविन शिकण्याची भूक पाहिजे. मुलांना उद्देशून ते म्हणाले जे कराल ते मनापासून करा.

खूप प्रेमाने करा. आज आपण खूप व्यस्त होत चाललोय त्यातून वेळ काढून आपण आई-वडिलांशी जोडले राहिले पाहिजे. त्यातच खरा आनंद आहे. यावेळी त्यांनी नाना पाटेकर, माधुरी दिक्षित, अमिताभ बच्चन यांच्या बरोबर काम करतानाचे किस्से देखील मोठ्या गमतीने सांगितले. त्यांची दोन्हीही मुल मराठी माध्यमातून शिकली. आज मराठी शाळा वाचवण्यासाठी त्यांच्या पत्नी चिन्मयी व स्वतः राघवन कार्यरत आहेत. लोकसाधने विषयी बोलताना ते म्हणाले की कौशल्य शिक्षण अणि



मूल्यशिक्षण देणारी ही संस्था आहे. याचा फायदा सर्वांनी घेतला पाहिजे. ते पुढे म्हणाले की, माझे शाळेतील वर्गमित्र शैलेश खुळे यांचेमुळे मी चिखलगावला आलो असे नमूद करताना मैत्री कशी जपली पाहिजे हे देखील सुमीत राघवन यांनी अधोरेखित केले. खुळे हे लोकसाधनेच्या तंत्र शिक्षण विभागाचे प्रमुख आहेत. डा. राजा दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कवितेच्या माध्यमातून लोकसाधनेच्या जडण - घडणीचा प्रवास उलगडला. यात ४० पेक्षा जास्त मुलांचा सहभाग होता. हे स्वरचित कविता व त्यावरचे सादरीकरण पाहताना प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले होते.

यावेळी व्यासपिठावर डा. राजा दांडेकर, राजेश खेडेकर, सरपंच दिनेश आडविलकर, अड. कैवल्य दांडेकर, चेतना बाळ, अरूण गांधी. माध्यमिक शाळेचे मुख्या. पांडुरंग ढेरे, प्राथमिक शाळेचे मुख्या. दिनेश नाचणेकर, संस्थेच्या प्रीती पेवेकर, सुशांत बाळ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक पांडुरंग ढेरे, परिचय आणि स्वागत अड कैवल्य दांडेकर तसेच सूत्रसंचालन राकेश आंबेरकर यांनी केले, तर सिया झगडे यांनी आभार मानले.

## गणेश मंडळांना मंडपासाठी सलग ५ वर्षांची परवानगी, ६ ऑगस्टपासून एक खिडकी योजनेनुसार मिळणार ऑनलाइन परवानगी

**मुंबई :** गणेशोत्सव साजरा करणाऱ्या गणपती मंडळांना मंडप उभारण्यासाठी परवानगी देण्याची प्रक्रिया येत्या ६ ऑगस्टपासून सुरू होणार आहे. गेली दहा वर्षे शासन नियमांचे व कायद्याचे पालन करणाऱ्या, कोणतीही तक्रार नसलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सलग पाच वर्षांकरिता विभाग कार्यालयामार्फत एकदाच परवानगी देण्यात येणार आहे. असे असले तरी दरवर्षी परवानगी नूतनीकरण करणे गरजेचे असेल.

गणेशोत्सवाला आता जेमतेम एक महिना शिल्लक असून गणेशोत्सव मंडळांची तयारी सुरू झाली आहे. ७ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरुवात होत असून ऑगस्ट महिन्यापासून मोठ्या गणेशमूर्तींचे आगमन सुरू होते. त्यामुळे मंडपांच्या परवानगीसाठी पालिकेची यंत्रणाही सज्ज झाली असून राज्य सरकारच्या निर्णयानुसार उत्कृष्ट काम करणाऱ्या गणेशोत्सव मंडळांना यावर्षीपासून सलग पाच वर्षांसाठी परवानगी देण्यात येणार आहे. या मंडळांना दरवर्षी या परवानगीचे नूतनीकरण करावे लागणार आहे. या नुतनीकरणात वाहतूक आणि स्थानिक पोलिसांची परवानगी प्राप्त करणे आवश्यक असेल. याशिवाय खासगी जागेवर परवानगी प्राप्त झालेल्या मंडळांना उत्सवापूर्वी विहित कालावधीत जागामालक अथवा सोसायटीचे ना हरकत प्रमाणपत्र तसेच वाहतूक पोलीस व स्थानिक पोलीस यांची परवानगी प्राप्त



करून घेणे आवश्यक असेल. एक खिडकी योजनेनुसार ६ ऑगस्टपासून संगणकीय प्रणालीद्वारे सार्वजनिक गणेश मंडळांना मंडप उभारणीसाठी ऑनलाइन परवानगी देण्यात येणार आहे. प्राप्त अर्जांची विभागीय कार्यालयाकडून छाननी करण्यात येईल त्यानंतर स्थानिक पोलीस स्टेशन वाहतूक पोलीस विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र ऑनलाईन प्राप्त करून नियमानुसार मंडपासाठी परवानगी देण्यात येणार आहे. यंदा नव्यानेच सार्वजनिक उत्सव साजरा करणाऱ्या मंडळांसाठी देण्यात येणारी मंडप उभारण्याची परवानगी ही या वर्षासाठीच मर्यादित असेल.१०० रुपये शुल्क मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सन २०२४ च्या उत्सवासाठी अवघे १०० रुपये शुल्क आकारण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या :https:// portal.mcgm.gov.inी या संकेतस्थळावर

६ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजल्यापासून संगणकीय एक खिडकी पद्धतीने अर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

५०० टन मोफत शाडू माती वाटप पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा व्हावा यासाठी श्रीगणेश मूर्ती तयार करणाऱ्या मूर्तीकारांना मोफत शाडूची माती, मंडपासाठी नि:शुल्क जागा (प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार) देण्यात आली आहे.

विशेष म्हणजे गणेशोत्सवासाठी मूर्तीकारांना देण्यात आलेली परवानगी नवरात्रोत्सवापर्यंत कायम राहील. याशिवाय मूर्तीकारासाठी एक खिडकी योजना देखील राबविण्यात आली आहे. आतापर्यंत १२३७ मूर्तिकारांकडून मंडप परवानगीसाठी ऑनलाइन अर्ज आले आहेत. आतापर्यंत मोफत शाडू मातीसाठी एकूण २१७ मूर्तिकारांनी मागणी केली असून, त्यांना आतापर्यंत सुमारे ५०० टन मोफत शाडू माती देण्यात आली आहे. त्यामुळे शाडू मातीपासून तयार केलेल्या गणेश मूर्ती स्थापना करण्याचे प्रमाण यंदा वाढणार आहे.

संपादकीय

## वाढत्या शहरांना पाऊस सोसवेना

पुण्यासह काही शहरांमध्ये अलीकडच्या काही दिवसांमध्ये निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे सामान्यांचे अतोनात हाल झाले. खरे तर त्यांचे असे हाल गेली काही वर्षे दर पावसाळ्यात सातत्याने होतच आहेत. शहरांमध्ये प्रचंड वेगाने होत असलेली बेसुमार बांधकामे, नद्यांच्या प्रवाहांशी केलेली छेडछाड, वृक्षतोड आणि तथाकथित विकासाचा अनाठायी सोस ही कारणे त्यामागे आहेत. शहर नियोजन ही गांभीर्याने करायची गोष्ट आहे, हे आपण कधी समजून घेणार आहोत?

मुंबई–ठाण्याच्या दिशेने झेपावणारा समृद्धी महामार्ग, गुजरातपासून नवी मुंबईच्या जवाहरलाल नेहरू बंदरापर्यंत निर्माणाधीन असलेला बडोदा–मुंबई मार्ग, मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेन, विरार–अलिबाग कॉरिडॉर, नवी मुंबई विमानतळ याशिवाय अनेक लहान–मोठे उड्डाणपूल, उन्नत मार्ग, बोगद्यांची कामे रायगड, ठाणे आणि पालघर या तीन जिल्ह्यांमध्ये सुरू आहेत. नवी शहरे, नव्या प्रकल्पांसाठी केले जाणारे शेकडो एकर जमिनींचे संपादन, भातशेतींच्या जमिनीवर सुरू असलेला दगड, माती, काँक्रीटचा भराव, लहान टेकड्या कापून सपाट झालेल्या जमिनीवर उभे केले जाणारे प्रकल्प आणि कसलाही धरबंध नसल्याप्रमाणे खाडी, नदी, नाले बुजवून वाड्या, वस्त्या, गाव, शहरांमध्ये उभी रहाणारी बेकायदा बांधकामे यामुळे मुंबईलगत असलेल्या महानगरांच्या प्रदेशाला दरवर्षी महापुराचा फटका बसू लागला आहे.

अडीच वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्रीपद आले आणि महानगर प्रदेशासह ठाणे जिल्हा विकासाच्या केंद्रस्थानी आला. मुंबई महानगर विकास प्राधिकरण, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, सिडको यासारख्या शासकीय संस्थांनी अक्षरश: हजारो कोटी रुपयांचे प्रकल्प या भागात आखण्यास सुरुवात केली. महानगर प्रदेश प्राधिकरण हे मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत असलेल्या नगरविकास विभागाचा महत्त्वाचा भाग. त्यामुळे अलिबागपासून, पालघरपर्यंत जेथे मोकळी जमीन दिसेल तेथील विकासाचे अधिकार या प्राधिकरणाकडे सोपविण्याचा सपाटाच सुरू झाला. नवे रस्ते, बोगदे, पूल, उड्डाणपूल, उन्नत, खाडी, भुयारी मार्ग यासाठी सव्वादोन लाख कोटींचे प्रकल्प राज्य सरकारने ठाणे आणि आसपासच्या प्रदेशात आखले आहेत. यासाठी मिळेल तेथील, मिळेल तितकी जमीन संपादित करायची आणि गावागावांच्या वेशीवर अवाढव्य प्रकल्प करायचा असा शिरस्ताच या भागात सुरू आहे. .

पूरवाहिनी नदी

ठाणे जिल्ह्यातून वाहणाऱ्या उल्हास नदी किनारी गेल्या काही वर्षांत अमर्याद बांधकामे उभी राहिली आहेत. त्यामुळे बदलापूर अलीकडे पूरग्रस्त शहर ठरले आहे. या शहरात अनिर्बंध पद्धतीने नाले अडवले गेले. नैसर्गिक नाल्यांचे मार्ग बदलण्यात आले. काही ठिकाणी ते अरुंद करून तिथे बांधकाम करण्यात आले. त्यामुळे दरवर्षी एक ते दोन दिवस बदलापूर शहरातील हजारो घरे पाण्याखाली जातात. त्यानंतरही स्थानिक बांधकाम व्यावसायिक जे लोकप्रतिनिधीही आहेत, पूररेषा हटवावी अशी मागणी राज्याच्या प्रमुखांकडे करण्यासाठी सातत्याने कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहेत.

भातशेती गिळली

ठाणे जिल्ह्यात सध्या नागपूर–मुंबई समृद्धी महामार्ग आणि उरण–वडोदरा महामार्गाची उभारणी अंतिम टप्प्यात आहे. त्याच्या उभारणीसाठी अंबरनाथ, कल्याण, शहापूर आणि भिवंडी तालुक्यांतील जमीन भूसंपादित करण्यात आली आहे. यात बहुसंख्य जमिनी या शेतजमिनी होत्या. जलयुक्त शिवार योजनेत भातशेती पाणी धरून ठेवण्यासाठी आणि पाणी जमिनीत मुरवण्यासाठी ती महत्त्वाची मानली गेली. या भातशेतीत आता भराव घालून समृद्धी आणि मुंबई–वडोदरा महामार्गाचे रस्ते बांधले जात आहेत. हा भराव अनेक ठिकाणी तो दहा फुटांपासून ३० फुटांपर्यंत गेला आहे. या शेतजमिनीवर साचणारे पाणी आता रस्त्यावर जाऊन साचते आहे. त्याचा फटका वाहतुकीला बसतो आहे. गेल्या वर्षात शहापूर तालुक्यातील महाळुंगे या कोयना धरणग्रस्तांच्या गावातील विहिरीत 'समृद्धी'च्या कामामुळे सांडपाणी शिरल्याच्या तक्रारी आल्या. समृद्धीच्या वाटेवरील गावागावांमधून अशा तक्रारी आता पुढे येत आहेत. नैसर्गिक प्रवाह अडल्याने पावसाचे पाणी मुख्य रस्त्यांवर येऊ लागले आहे.

# जिल्ह्यात जुलै अखेर वार्षिक सरासरीच्या ६३.२ टक्के पाऊस २८ लघु प्रकल्पांपैकी २३ पूर्ण क्षमतेने भरले : १७४७ नागरिक स्थलांतरित

रायगड जिल्हा उत्तर प्रतिनिधी मंगेश यादव

रायगड जिल्ह्यात जुलै महिन्यात मुसळधार पाऊस कोसळला आहे. रायगड जिल्हा नैसर्गिक आपत्ती बाबत दैनंदिन अहवालात मिळालेल्या पावसाच्या अहवालानुसार सोमवार (ता.२९) पर्यंत जिल्ह्यात वार्षिक सरासरीच्या ६३.२ टक्के पर्जन्य झाले असल्याची नोंद आहे. येथील २८ लघु प्रकल्पांपैकी २३ लघु प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले आहेत. आणि आत्तापर्यंत १७४७ नागरिक स्थलांतरित आहेत.ङ्कङ्क जिल्ह्यात वार्षिक सरासरी ३१४८.६० मिमी इतका पाऊस पडतो. जुलै अखेर पर्यंत जिल्ह्यात १९८८.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. म्हणजे वार्षिक सरासरीच्या ६३.२% पर्जन्य झाले आहे. ही स्थिती दिलासादायक आहे. कुंडलिका, अंबा, सावित्री, पाताळगंगा, उल्हास व गाढी या सर्व नद्या शांत झाल्या असून इशारा पातळीच्या खाली वाहत आहेत. तसेच जिल्ह्यातील सर्व रस्ते व रेल्वे वाहतूक सुरळीत सुरु आहे. नद्यांची पातळी (३० जुलै सकाळी ७:३० ची स्थिती)ङ्कङ्कुंडलिक नदी –





सद्यस्थिती २२.७० मीटर, धोका पातळी २३.९५ मीटर, इशारा पातळी २३.०० मीटर

अंबा नदी – सद्यस्थिती ५.४० मीटर, धोका पातळी ९.०० मीटर, इशारा पातळी ८.०० मीटर

सावित्री नदी – सद्यस्थिती ३.७० मीटर, धोका पातळी ६.५० मीटर, इशारा पातळी ६.०० मीटर

पातळगंगा नदी – सद्यस्थिती १९.६५ मीटर, धोका पातळी २१.५२ मीटर, इशारा पातळी २०.५० मीटर

उल्हास नदी – सद्यस्थिती ४४.२० मीटर, धोका पातळी ४८.७७ मीटर, इशारा पातळी ४८.१० मीटर

गाढी नदी – सद्यस्थिती १.८५ मीटर, धोका पातळी ६.५५ मीटर, इशारा पातळी ६.०० मीटर

जीवितहानी मिळालेल्या माहिती नुसार ३० जुलै पर्यंत जिल्ह्यात आपत्तीमुळे चौघांचा मृत्यू झाला आहे. त्यातील पेण तालुक्यातील सापोली आदिवासी येथील यश चंद्रकांत नाईक झाड पडून, महाड दादली येथे नामदेव सीताराम अंबावले नदीमध्ये पडून, वाळण खुर्द येथील बाळाजी नारायण उतेकर ओढ्यात वाहून आणि मौजे टेमपाले येथील नसरीन रियाज गोडमे ओढ्यात वाहून मृत झाले आहेत.

पशुधन हानी जिल्ह्यात मोठी १३ जनावरे मृत झाली ज्यामध्ये ७ म्हैस, १ रेडा, २ गाय व ३ बैल मिळून १३ जनावरे मृत झाली आहेत. तर लहान जनावरांमध्ये ५ शेळ्या मृत झाल्या आहेत तर कोंबड्या व इतर पक्षी २५ मृत झाले आहेत. मोठ्या जनावरांमध्ये २ गाई आणि लहान जनावरांमध्ये दोन वासरे मिळून ४ जनावरे जखमी आहेत. तब्बल १७४७ नागरिक स्थलांतरित आत्तापर्यंत तब्बल ५६५ कुटुंबांचे स्थलांतर झाले असून यामध्ये १७४७ जणांचा समावेश आहे. यामध्ये ९१ कुटुंबातील २९५ व्यक्ती या नातेवाईकांकडे स्थलांतरित आहेत तर ४४७ कुटुंबांपैकी १४५२ व्यक्ती या कॅम्प मध्ये स्थलांतरित आहेत. एकूण कॅम्प संख्या २९ इतकी आहे. स्थलांतरित नागरिकांमध्ये सर्वाधिक पोलादपूर तालुक्यातील व त्यानंतर महाड, खालापूर आणि माणगाव येथील नागरिकांचा समावेश आहे. ङ्कङ्कङ्कङ्कमालत्तेचे नुकसान ङ्कमिळालेल्या माहितीनुसार ३० जुलै पर्यंत ११ पूर्णतः पक्के घरे, १९ पूर्णतः कच्ची घरे, ३३० अंशतः पक्की घरे व १२३ अंशतः कच्ची घरे, ५ झोपड्या, ७२ गोठे व १३ दुकानांचे नुकसान झाले आहे. तर ८ सार्वजनिक मालमत्तेचे पूर्णतः व १५ सार्वजनिक मालमत्तेचे अंशतः नुकसान झाले आहे.

एनडीआरएफ व एसडीआरएफ टीम सज्जआपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे. रमाई विहार महाड येथे एनडीआरएफ व एसडीआरएफ टीम सज्ज ठेवण्यात आली आहे. यामध्ये २ इन्स्पेक्टर, ३ सब इन्स्पेक्टर, २९ जवान असे मिळून ३४ जण तैनात आहेत.

# मुख्य प्रवाहातून बाहेर असल्यानेच मराठा समाज आरक्षणास पात्र, राज्य मागासवर्ग आयोगाची उच्च न्यायालयात भूमिका

**मुंबई :** भारतासारख्या उच्च आर्थिक वृद्धी असलेल्या देशात, सामान्यत: सर्व पैलू प्रगतीशील असणे अपेक्षित आहे. परंतु, मराठा समाजाच्या बाबतीत ही स्थिती नाही. किंबहुना, सध्याच्या आर्थिक परिस्थितीच्या विरोधात, मराठ्यांची दयनीय आर्थिक स्थिती ही त्यांचे असामान्य आणि असाधारण आर्थिक मागासलेपण दर्शवते.

हा समाज मुख्य प्रवाहातून बाहेर ढकलला गेला आहे. त्यामुळे, मराठा समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात आरक्षण देण्याची गरज आहे, असा दावा राज्य मागासवर्ग आयोगाने उच्च न्यायालयात केला आहे.

मराठा समाजाला आरक्षणा देण्याची शिफारस करताना परिमाणात्मक संशोधन आणि अभ्यास केला गेला. शिवाय, मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत यापूर्वीच्या आयोगांनी दिलेले अहवाल आणि केलेल्या शिफारशींचाही अभ्यास करण्यात आला. या सगळ्यांतून राज्यात मराठा समाजाला तुच्छतेने पाहिले जात असल्याचे आणि या समाजात अपवादात्मक मागासलेपण असल्याचे समोर आल्याचा दावाही मराठा समाजाला सरकारी नोकऱ्या देताना आणि शिक्षणात १० टक्के आरक्षणाची शिफरस करण्याच्या निर्णयाचे समर्थन करताना निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या राज्य मागासवर्ग आयोगाने उच्च न्यायालयात दाखल प्रतिज्ञापत्रात केला आहे.

राज्य मागासवर्ग आयोगाला प्रतिवादी करण्याचा आग्रह काही आरक्षणविरोधी याचिकाकर्त्यांनी केला होता. त्यानंतर, आयोगाला प्रतिवादी करण्यात आले. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय, न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला यांच्या विशेष पूर्णपीठाने आयोगाला सगळ्या याचिकांवर एकत्रित उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले होते.




त्यानुसार, आयोगाने प्रतिज्ञापत्र सादर करून या प्रकरणी भूमिका स्पष्ट केली.भारतासारख्या उच्च आर्थिक वृद्धी असलेल्या समाजात सामान्यत: सर्व पैलूंवर प्रगतीशील कल अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर, मागासलेपणाकडे अपवादात्मक आणि सामान्यपणाच्या परिणामापलीकडे पाहणे आवश्यक होते. परंतु मराठा समाजाच्या बाबतीत ही स्थिती नाही. त्यांचे मागासलेपण आणि दयनीय आर्थिक स्थिती लक्षात घेता मराठा समाजाला मुख्य प्रवाहाचा भाग मानले जाऊ शकत नाही, असे आयोगाने नमूद केले आहे. मराठा समाजाचे मागासलेपण तपासताना विशेषत: जात, पारंपरिक व्यवसाय तसेच सध्याचे व्यवसाय यांचा विचार करता त्यात मोठ्या प्रमाणात व गंभीर स्वरुपाची तफावत दिसून येते. मराठा समाजातील महिला आणि पुरुष दोघेही मोठ्या प्रमाणावर अंगमेहनतीची कामे करत असल्याचेही अभ्यासात स्पष्ट झाले आहे, असेही नमूद करण्यात आले आहे.

मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गातील व्यक्तींचे राहणीमान, जमीन मालकी आणि आर्थिक दायित्वांमधील लक्षणीय असमानता दिसून येते. याशिवाय, मराठा समाजातील दारिद्र्याचा दर उच्च असून मराठा समाजातील बहुतांश लोक कच्च्या घरांतच अद्याप राहतात. मराठा समाजाकडून कर्ज घेण्याचे प्रमाण अधिक असल्याचे आयोगाने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे. अभ्यासानुसार, मराठा समाजातील व्यक्तींनी खुल्या प्रवर्गातील व्यक्तींच्या तुलनेत कमी शिक्षण घेतले आहे. या सगळ्या निष्कर्षांतून मराठा समाजासमोरील अडथळे अधोरेखित होतात. त्यात सामाजिक ठपका आणि त्यांच्या सामाजिक मागासलेपणाला कारणीभूत असलेल्या प्रथांचा समावेश असल्याचेही आयोगाने म्हटले आहे.मराठा समाजात आत्महत्यांचे प्रमाण अधिक

मराठा समाजातील व्यक्तींनी केलेल्या आत्महत्येचे प्रमाणही इतर जातींच्या तुलनेत अधिक असून हे त्यांच्यातील कमालीच्या नैराश्याचे लक्षण आहे. मराठा समाजासह खुल्या वर्गातील व्यक्तींच्या आत्महत्येची गेल्या दहा वर्षांतील आकडेवारी लक्षात घेतली तर त्यातील केवळ ५.१८ टक्के बिगर मराठा व्यक्तींनी आत्महत्या केल्याचे दिसते. याउलट, मराठा व्यक्तींच्या आत्महत्येची टक्केवारी ही ९४.११ होती. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या आकडेवारीबाबतही हेच आहे. राज्यात २०१८ ते २०२३ या कालावधीत इतर प्रवर्गातील शेतकऱ्यांच्या तुलनेत आत्महत्या करणाऱ्या मराठा शेतकऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. सामाजिक व्यवस्थेत आपली स्थिती सुधारण्याच्या संधींच्या अभावामुळे उद्भवलेल्या चिंताजनक परिस्थितीतून बाहेर येण्याचा कोणताही मार्ग दिसत नसल्याने आत्महत्येचे पाऊल उचलले जाते, असे प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आले आहे.

याचिकाकर्त्यांच्या आरोपांबाबत भाष्य नाही

मराठा आरक्षणाला आव्हान देणाऱ्या काही याचिकाकर्त्यांनी आपल्यासह आयोगाच्या काही सदस्यांवर वैयक्तिक स्वरूपाचे उथळ, खोटे आणि निराधार आरोप कले आहेत. परंतु, याचिकांमध्ये आरक्षणाला आव्हान देण्यात असून त्याच्याशी या आरोपांचा काहीही संबंध नाही. त्यामुळे, या आरोपांबाबत भाष्य करणार नसल्याचे आयोगानेही प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्ट केले आहे.

५० टक्क्यांची मर्यादा बंधनकारक नको आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडण्यावर कोणतेही बंधन नसल्याचा दावाही आयोगाने प्रतिज्ञापत्रात केला आहे. याउलट, ५० टक्क्यांची मर्यादा ही केवळ मार्गदर्शिका आहे. ती अनिवार्य किंवा न ओलांडणे बंधनकारक नाही. त्यामुळे, अपवादात्मक किंवा असाधारण परिस्थितीत ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण देण्यास कोणताही प्रतिबंध नाही, असेही आयोगाने म्हटले आहे.

आंदोलनांतून समाजाची अस्वस्थता अधोरेखित

सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास म्हणून सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात आरक्षण देण्याची मागणी मराठा समाजाकडून गेले काही वर्षे सतत केली जात आहे. त्यासाठी राज्यात आंदोलनेही करण्यात आली आणि सुरू आहेत. काही आंदोलनांना हिंसक वळणही लागले. राज्य सरकारने उपलब्ध केलेल्या आकडेवारीनुसार, आरक्षणाच्या मागणीसाठी २०२३–२४ या वर्षात ९५ मराठा तरुणांनी वर्षभरात आत्महत्या केल्या. या घटनांमुळे मराठा समाजातील वेदना, निराशा आणि अस्वस्थता दिसून आल्याचे आयोगाने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

# साताऱ्यातील धबधबे आणि पर्यटनस्थळे ५ ऑगस्टपर्यंत बंद!

सातारा : मुंबईत काही काळ पावसाने विश्रांती घेतली असली तरी राज्यातील इतर भागांत पावसाची जोरदार बॅटिंग सुरु आहे. विदर्भासह पश्चिम महाराष्ट्रातही मुसळधार पाऊस सुरू आहे. जनजीवन विस्कळीत झालं आहे. त्यामुळे नागरिकांना या भागात प्रवास करताना अधिक काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.



शिवाय हवामान विभागाने सातारा जिल्ह्यात १ ते ५ ऑगस्ट दरम्यान अतिवृष्टीचा रेड व ऑरेंज अलर्टचा इशारा दिल्याने साताऱ्यातील धबधबे आणि पर्यटनस्थळे ५ ऑगस्टपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी होत आहे. हवामान विभागाने सातारा जिल्ह्यात आणि घाट क्षेत्रात मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पर्यटनस्थळांच्या ठिकाणी कोणतीही अनुचित घटना घडू नये तसेच जिवीत व वित्तहानी होऊ नये याकरता सर्व पर्यटनस्थळे पर्यटकांसाठी तात्पुरत्या स्वरुपात बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी आज दिले आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं.कोणकोणत्या पर्यटनस्थळांवर जाण्यास बंदी?सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर तालुक्यातील- लिंगमळा व भिलार धबधबा तसेच सर्व पर्यटनाचे पॉइंट, पाटण तालुक्यातील ओझर्डे (नवजा) व सडावाघापूर धबधबा, सातारा तालुक्यातील- ठोसेघर, केळवली, वजराई-भांबवली धबधबे व कास तलाव तसेच जावली तालुक्यातील- ऐकीव या धबधब्यांच्या ठिकाणी विशेषत: मान्सून कालावधीत वर्षाविहारासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात. ही सर्व पर्यटन स्थळे पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी तात्पुरती बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांनी काय आदेश दिले?सदर धबधब्यांच्या ठिकाणी जाणारे मार्ग / रस्ते बंद करण्यात आलेत. पोलीस विभाग व संबंधित गावातील वन हक्क समितीने धबधब्याच्या ठिकाणी पर्यटक जाणार नाहीत, तसेच सदर ठिकाणी कोणतीही अनुचित घटना घडू नये याबाबत दक्षता घ्यावी. पर्यटन स्थळी आवश्यकतेनुसार पोलीस बंदोबस्त नेमण्यात यावा व आवश्यक त्या ठिकाणी पेट्रोलिंग करावे. पोलीस बंदोबस्तासाठी आवश्यकतेनुसार होमगार्ड विभागाची मदत घेण्यात यावी. आवश्यकता भासल्यास नियमांचा भंग करणाऱ्यांविरुध्द आवश्यक ती कठोर कारवाई करावी, असे आदेश देखील जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

# कर्जत ज्येष्ठ नागरिक संघातर्फे मैत्रीदिनानिमित्त सहल...

कर्जत :-जयेश जाधव

३० जुलै हा दिवस आंतराष्ट्रीय मैत्री दिन.हया दिवशी अनेक संस्था विविध उपक्रम राबवतात.रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील ज्येष्ठ नागरिक संघातर्फे कर्जतपासून चाळीस की.मी.अंतरावर असलेल्या





आंबिवली येथील '' वनविहार '' या निसर्गरम्य ठिकाणी सहलीचे आयोजन करण्यात आले होते.त्यात साठ वर्षांपासून ऐंशी वर्षांपर्यंतचे ८३ ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते.

शंभर एकर घनदाट जंगल असलेल्या परीसरात ज्येष्ठ नागरिकांनी वृक्षारोपण करून निसर्गाशी मैत्री साधली.या परिसरात असलेल्या लेण्यांना सर्वांनी भेट दिली.सहलीचा आनंद लुटताना कोणीही पावसाची पर्वा केली नाही.सुग्रास भोजनानंतर सर्व सभासदांनी कथा कथन , कविता वाचन , नकला इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम केले.रायगड भूषण ह.भ.प.सौ.योगिता गणेश थरपुडे यांच्या प्रवचनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

याप्रसंगी संयोजकांनी जाण्यायेण्याची , सुग्रास भोजनाची उत्तम सोय केल्यामुळे सर्व सभासद खुश झाले होते.

# पुराच्या पाण्यात ट्रॅक्टर उलटल्याने ८ जण वाहून गेले!

कोल्हापूर : राज्यात पावसाने जोर धरल्यामुळे अनेक दुर्घटना सातत्याने समोर येत आहेत. त्यातच आता कोल्हापुरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. कोल्हापुरात गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक गावांना पुराच्या पाण्याने वेढा घातल्याने जनजीवन विस्कळीत झालं आहे. अशातच शिरोळ तालुक्यात पुराच्या पाण्यात ट्रॅक्टर उलटून मोठी दुर्घटना घडली. ट्रॅक्टरमधील ८ जण वाहून गेले आहेत. यापैकी तिघांना



वाचवण्यात यश आलं आहे तर इतर ५ जणांचा शोध सुरु आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोल्हापुरात पावसामुळे नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. पंचगंगा नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून अनेक गावांना पुराच्या पाण्याचा वेढा पडला आहे. अशातच गावाला होणारा पाणीपुरवठा करण्यासाठी गावातील काही नागरिक ट्रॅक्टरमधून विद्युत पंप सुरू करण्यासाठी जात होते. या ट्रॅक्टरमधून ८ जण प्रवास करीत होते. त्याचवेळी शिरोळ तालुक्यात बस्तवड अकिवाट मार्गावर पुराच्या पाण्यात अचानक ट्रॅक्टर उलटला. त्यामुळे ट्रॅक्टरमध्ये बसलेले आठही लोक पाण्यात बुडाले.

घटनास्थळी एनडीआरएफची टीम दाखल झाली असून पुराच्या पाण्यात वाहून गेलेल्या व्यक्तींचा शोध घेतला जात आहे. यापैकी तिघांना वाचवण्यात यश आलं असून नाकातोंडात पाणी गेल्याने त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. मात्र, अजूनही ५ जण बेपत्ता असून त्यांचा शोध सुरु आहे. या घटनेमुळे परिसरातून मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

# कुणबी समाजोन्नती संघ मुंबई शाखा तालुका तळा ग्रामीण शाखेच्या वतीने समाजातील युवकयुवतींचा सत्कार.

तळा कृष्णा भोसले.

कुणबी समाजोन्नती संघ मुंबई शाखा तालुका तळा ग्रामीण शाखेच्या वतीने समाजातील नुकत्याच झालेल्या वकिली




उत्तीर्ण उमेदवारांचा सत्कार करण्यात आला.ङ्ग यामध्ये किरण अडखळे, देवानंद शिगवण, पुनम भोईरङ्गहे नुकतीच वकील परिक्षा पास झाले. तर कु.आशा अडखळे एम. एस.सी बी. एड, तर कु. प्रिया डिके एम. बी. ए. या उत्तीर्ण झाल्याने त्यांचा समाजाचे वतीने सत्कार करण्यात आला.ङ्ग यावेळी शाखा अध्यक्ष नामदेव काप, उपाध्यक्ष तुकाराम पाटेकर, समाजनेते रविद्रं माडंवकर,जनार्दन पांढरे, लोखंडे,ङ्गभानुदास मंचेकर, पांडुरंग कळंबे, काशिनाथ तांदळेकर, वङ्गइतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी खडतर व कष्टमय परिस्थितीतीचा सामना करीत त्यांनी आपले ध्येय गाठलेङ्गअशा या विदयार्थी उमेदवारांना सारयानींच शुभेच्छा दिल्या.

## मगरमिठीत महानगरे

एक दिवस पडलेल्या मुसळधार पावसाने, खडकवासला धरणातून सोडल्या गेलेल्या जादा पाण्याने पुण्यातल्या नागरिकांची उडालेली दैना हे आपल्या तथाकथित विकासाचे, स्मार्ट शहरांच्या स्वप्नाचे अत्यंत भकास आणि विद्रूप रूप आहे. गावांच्या तुलनेत शहरे विकसित, रोजगार देणारी, चांगले जीवनमान देणारी मानली जातात. ती कुठला ना कुठला रोजगार देतात हे खरेच. पण एरवीच्या बकाली, प्रदूषण या प्रश्नांच्या जोडीला आता पावसाचे पाणी थेट घराच्या दारातच आणून सोडू लागली आहेत. पुण्यात आनंदनगरमधल्या निंबजनगरसारख्या भर शहरात असलेल्या वस्तीमध्ये राहणाऱ्या लोकांना होडीतून बाहेर आणावे लागणे हे दृश्य त्यामुळे विदारकच होते. काल ते पुण्यात होते, त्याआधी कधी मुंबईत, कधी ठाण्यात, कधी कोल्हापुरात, कधी चिपळूणमध्ये एवढेच नाही तर चेन्नई, बेंगळूरु, कोलकाता, श्रीनगर अशा कोणत्याही शहरात या ना त्या पावसाळ्यात कोणत्या ना कोणत्या भागात अशीच परिस्थिती असते. एखादा मोठा पाऊस होऊन गेल्यानंतर रस्त्यांवरून नदीसारखे वाटावे अशा पद्धतीने वाहणारे पाणी, कुठे कुठे जीव मुठीत घेऊन थांबलेली माणसे आणि पाण्यातून वाहून जाणाऱ्या दुचाक्याच नाही तर चारचाक्याही. या दुरवस्थेतून आता कुठलीही शहरे सुटलेली नाहीत. पाणीटंचाई झेलत उन्हाळ्याचे चार महिने काढल्यानंतर आलेला पाऊस असा जीवघेणा ठरतो हे विकासाच्या कोणत्या स्वप्नात बसते हा प्रश्न तिथल्या रहिवाशांना पडत असेलच, पण तो विचारणार कुणाला? पावसाने झोडपले तर तक्रार कोणाकडे करायची, हे अद्यापही कुणाला माहीत नाही. कारण पावसाने एखाद्या शहराला झोडपले तरी त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा नागरिकांना फटका बसू नये ही तळपासून वरपर्यंत कोणत्याच राजकारण्यांना, प्रशासकांना त्यांची जबाबदारी कुठे वाटते? राजकारण्यांच्या दृष्टीने नागरिक म्हणजे फक्त निवडणुकीच्या काळात मते देणारे मतदाते. प्रशासकांच्या दृष्टीने नागरिक म्हणजे दरमहा त्यांचे पगार, भत्ते यांची सोय करणारे करदाते. यापलीकडे नागरिकांच्या जगण्यामरण्याशी त्यांना काहीच देणेघेणे नाही. आज ते पुरात मरतील, उद्या पाण्याअभावी, परवा एखाद्या आगीत काय फरक पडतो? राज्यकर्त्यांना रामराज्य आणायचे असेल तर नागरिकांना रामभरोसे जगावेच लागते, याचे यापेक्षा आणखी उदाहरण काय पाहिजे?

नगरनियोजनाची ऐशीतैशी म्हणजे आपली सगळी शहरे आणि निमशहरे. शहरे म्हणजे खरे तर मोठी खेडीच. घरे, रस्ते, वीज, पाणी यांच्या बाबतीत त्यांची लोकसंख्या सामावून घेण्याची क्षमता किती आहे, याचा विचारही न होता, ती फुगत चालली आहेत. त्यामुळे मागणी तसा पुरवठा या न्यायाने घरे उपलब्ध करून देणे आले. एखाद्या शहराच्या बाहेरील परिसर महापालिकेत समाविष्ट होण्याची कुणकुण लागली की तिथे गवत उगवावे तशा इमारती उभ्या राहतात. बांधकामांच्या सगळ्या नियमांचे उल्लंघन हीच जणू त्यांची पूर्वअट असते. साहजिकच तिथली घरे तुलनेत स्वस्तात उपलब्ध असतात. त्यामुळे मग ती विकत घेतली जातात. कालपरवा पाण्याखाली गेलेले पुण्यातील निंबजनगर हे गेल्या ३०-४० वर्षांमध्ये अशाच पद्धतीने मुठा नदीच्या अगदी पात्रालगत उभे राहिले आहे. अगदी खेटून असलेल्या इमारती, निकृष्ट बांधकाम हे सगळे करून त्यात पैसे कमावणारे सगळेच जण बाजूला झाले आहेत आणि तिथल्या रोजच्या प्रश्नांशी झगडतो आहे तो तिथे राहणारा सामान्य माणूस. नगररचनेशी, नगरनियोजनाशी देणेघेणे नसलेल्या राज्यकर्ते आणि प्रशासकांच्या अभद्र युतीमुळे तो जगण्यातल्या समस्यांमध्ये किती खोलवर बुडाला आहे, हे त्याला प्रत्यक्षात बुडवायला येणाऱ्या पाण्याला कसे समजणार?

त्यामुळेच २६ जुलै २००५ च्या ढगफुटीत मिठी ही नदी आहे, नाला नाही, हा साक्षात्कार मुंबईकरांना झाला तसाच मुठा ही नदी आहे, घरे बांधण्याची, वाहनांच्या पार्किंगची, रस्त्यांची जागा नाही, हा दरवर्षीच्या पावसाळ्यात पुणेकरांना नव्याने होतो आणि पावसाळा संपला की पुन्हा पहिले पाढे पंचावन्न. फक्त पुण्यात वा मुंबईतच नाही, तर सगळ्या शहरांमध्ये थोड्याफार फरकाने हेच सुरू आहे. नगरनियोजन हा आपला विषय नाही, अशीही राज्यकर्त्यांची समजूत असण्याची शक्यता आहे. त्यामुळे एखाद्या मोठ्या रुग्णालयाला लागून एखादा भव्यदिव्य मॉल उभा राहू शकतो आणि तिथल्या मल्टिप्लेक्समध्ये सिनेमा पाहायला जाणारा सिनेरसिक आणि हृदयविकाराचा झटका आल्यामुळे ॲम्ब्युलन्समधून रुग्णालयात जाऊ पाहणारा रुग्ण असे दोघेही एकाच वेळी वाहतूक कोंडीमध्ये अडकतात.

अति पावसामुळे निर्माण झालेल्या समस्यांबद्दल बोलावे तर घरे, बांधकामे, पाणी तुंबवणारा प्लास्टिकचा कचरा, रस्ते, वाहतूक कोंडी हे सगळे मुद्दे आपोआपच आले. या काळात निर्माण होणारे आरोग्याचे प्रश्न, बंद ठेवाव्या लागणाऱ्या शाळा, पाणी शिरून होणारे वाहनांचे नुकसान, पावसात पडणाऱ्या पाण्याचे नीट व्यवस्थापन यांचा तर उल्लेखही करता आलेला नाही. अंडाभुर्जीची गाडी चालवणारे तीन सामान्य जीव विजेचा शॉक लागून गेले, अशांची 'पावसाळी दुर्घटने'त मोजदाद तरी होते का? विकासाच्या स्वप्नांमध्ये या असल्या 'फालतू' गोष्टी झाकून ठेवल्या जातात आणि तिथे येतात मोठमोठे टॉवर्स, मोठमोठे महामार्ग. वेगवेगळ्या शहरांमध्ये अशा टॉवर्सच्या आसपासच्या परिसरातील वस्त्यांमध्ये याआधी पावसाचे पाणी साठत नव्हते आणि यंदाच ते साठू लागले, अशा तक्रारी येऊ लागल्या आहेत. अशाच तक्रारी समृद्धी महामार्गाच्या परिसरातील काही गावांनी केल्या आहेत, अशा बातम्याही यंदा आल्या आहेत. आपल्याला स्मार्ट सिटी हव्या आहेत, त्यात मेट्रो हव्या

# आतापर्यंत २२६ जणांचा मृत्यू, ५९,००० हून अधिक बेघर; मुख्यमंत्री बिरेन सिंह यांची माहिती

**मणिपूर :** गेल्या सव्वा वर्षापासून मणिपूरमध्ये मधील हिंसाचाराच्या घटनांनी देशाला हादरवून सोडलं आहे. अजूनही मणिपूरच्या



अनेक भागांमध्ये तणावपूर्ण शांतता आहे. मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन यांनी बुधवारी विधानसभेत माहिती दिली की मे २०२३ पासून राज्यात सुरू असलेल्या हिंसाचारात आतापर्यंत २२६ लोकांचा मृत्यू झाला आहे आणि ३९ बेपत्ता आहेत, तर ५९,४१४ लोक मदत शिबिरांमध्ये राहात आहेत.
ही आकडेवारी मंगळवारपर्यंतची असल्याचंही सांगण्यात आलं आहे.
हिंसाचारात तब्बल ११,१३३ घरे जाळण्यात आली असून विविध पोलीस ठाण्यात ११,८९२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.या सर्व परिस्थितीत राज्य सरकारानं विस्थापितांना आश्रय देण्यासाठी ३०२ मदत छावण्या स्थापन केल्या आहेत,

अशी माहिती देखील मुख्यमंत्र्यांनी दिली आहे.काँग्रेस आमदार के मेघचंद्र यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री बिरेन म्हणाले की, ५,५५४ शेतकऱ्यांच्या शेतजमिनी बाधित झाल्या आहेत, ज्यामुळे त्यांचे जीवन धोक्यात आले आहे.'शेतीच्या नुकसानीची दखल घेऊन, ३,४८३ बाधित शेतकऱ्यांना रु. १८.९१ कोटी पीक नुकसान भरपाई देण्यात आली आहे',
अशी माहिती देखील मुख्यमंत्र्यांनी दिली आहे.
कायमस्वरूपी घरे बांधण्यासाठी ७९८ लाभार्थ्यांना कायमस्वरूपी गृहनिर्माण योजनेअंतर्गत २१.६८ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. याशिवाय, ज्यांची घरे जळाली किंवा नुकसान झाले अशा २,७९२ कुटुंबांना अंतरिम मदत म्हणून रु.२५,००० देण्यात आले आहेत.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
शनिवार ०३ ऑगस्ट २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## मुंडे महाविद्यालयात ग्रेगर जॉन मेंडल यांची जयंती साजरी

मंडगणड(प्रतिनिधी)दि. :येथील सावित्रीबाई फुले षिक्षण प्रसारक मंडळाच्या लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने अनुवंशशास्त्राचे जनक ग्रेगर जॉन मेंडल यांची जयंती साजरी करण्यात आली. मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहूल जाधव उपस्थित होते. यावेळी इतिहास विभागप्रमुख डॉ.ज्योती पेठकर, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. संगीता घाडगे, प्राणीशास्त्र विभागाचे डॉ. शैलेश भैसारे, ग्रंथपाल डॉ. दगडू जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.ङ्ग कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहूल जाधव यांच्या हस्ते ग्रेगर जॉन मेंडल यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तत्पूर्वी डॉ. संगीता घाडगे यांनी प्रस्ताविक करुन सांगितले की, आजचे जेनेटीक्स



विषयाचा पाया हा ग्रेगर जॉन मेंडल यांच्या संशोधनावरच आधारीत आहे या विषयी थोडक्यात माहिती सांगितली.ङ्गयावेळी प्राचार्य डॉ. राहूल जाधव यांनी ग्रेगर जॉन मेंडल 'फादर ऑफ जेनेटीक्स' या विषयावर मार्गदर्शन करताना त्यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला. अनुवंशकतेचे जनक म्हणून त्यांची ओळख सर्वश्रृत आहे. कारण मेंडल यांनी अनुवंशकतेच्या नियमांचा सर्वप्रथम अभ्यास केला. ज्यावर अधारीत आज आपण अनेक वनस्पती व प्राण्यांचे अनेक वाण व जाती निर्माण केलेल्या आहेत. विविध शास्त्रज्ञांनी नवनवीन शोध लावून मानवाचे जीवन अधिक सुखकर केले असून विद्याथ्र्यांनी अशा शास्त्रज्ञांच्या कार्याला डोळयासमोर ठेवून आपले ध्येय ठरवावे व त्याप्रमाणे समाजउपयोगी संशोधन कार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. ङ्गकार्यक्रमास सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सत्रसंचालन डॉ. संगीता घाडगे यांनी तर उपस्थितांचे आभार डॉ. शैलेश भैसारे यांनी मानले.

## सुधागड तालुक्यात १ऑगस्ट २०२४रोजी महसूल दिन साजरा

या वेळी विविध कार्यक्रम पाली तहसील कार्यालयात राबविण्यात आले.

रायगड जिल्हा

उत्तर प्रतिनिधी/मंगेश यादव:

सुधागड पाली येथील महसूल कार्यालयात महसूल दिनाचे औचित्य साधून गोर-गरीब लाभार्थी महिलांना आवश्यक कागद पत्र मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी कागद पत्र ऑन लाईन अर्ज करून अर्ज भरून, अर्जाची पडताळणी करून पात्र लाभार्थीना आवश्यक कागद पत्र तात्काळ उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या वेळी रोह्याचे उप विभागीय अधिकारी श्री ज्ञानेश्वर खुटवड, पाली तहसील दार श्री उत्तम कुंभार, बालविकास अधिकारी सुधागड श्रीमती रंजना म्हात्रे, नायब तहसीलदार फुलपगारे, अडसुळे सर्व अधिकारी, कर्मचारी यांच्या उपस्थितीत शिबिराचे कार्यक्रम आनंदात साजरा करण्यात आला. या वेळी अंगनवाडी सेविकांनी मेहनत घेतली. सदर शिबिर स्थळी आधार सुविधा केंद्र सरकार केंद्राची सुविधा उपलब्ध करण्यात आली होती. बहुसंख्य महिलांनी या योजनेचां लाभ घेतला. या कार्यक्रमाला उस्फर्त प्रतिसाद मिळाला.









## कोलाड जवळील गोवे आदिवासी पूरग्रस्तांना सेंटर फॉर सोशल ॲक्शन चे स्टाफ व जीवनधारा संस्थेतर्फे मदतीचा हात

रायगड जिल्हा उत्तर

प्रतिनिधी/मंगेश यादव

जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कोलाड जवळील गोवे आदिवासी वाडीत पूर आला होता. या पूरग्रस्त लोकांना सेंटर फॉर सोशल ॲक्शन चे स्टाफ व जीवनधारा संस्थेतर्फे बुधवारी (ता.३१) पूर मदत सामग्री देण्यात आली. यामुळे या पूरग्रस्तांना दिलासा मिळाला. ङ्ग गोवे आदिवासी वाडी येथे झालेल्या पूर परिस्थितीमुळे येथील लोकांचे खूप नुकसान झाले होते. सेंटर फॉर सोशल ॲक्शन व जीवनधारा संस्थेचे कर्मचारी यांनी गोवे आदिवासी वाडी येथे भेट दिली. येथील लोकांसोबत पूर परिस्थितीमुळे झालेल्या नुकसानी बाबत चर्चा केली. तसेच सेंटर फॉर सोशल ऍक्शन व जीवनधारा यांच्यामार्फत त्यांना आधार देण्यात आला व जीवनधारा संस्था व सेंटर फॉर सोशल ॲक्शन यांच्या संयुक्त विद्यमानाने पुरग्रस्त २५ कुटुंबांना १ ताडपत्री, १ चटई, २ ब्लँकेट, राशन किट यांचे वितरण करण्यात आले.

सदर वितरण कार्यक्रमासाठी सेंटर फॉर सोशल ऍक्शनचे कर्मचारी विलास आठवले, जीवनधारा संस्थेच्या संचालिका हिल्डा फर्नांडिस, सुरेखा माल्या, मिनोती करकरे, सुरेखा गुजर व कर्मचारी, कोलाड पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक श्री. भोसकर, हवालदार मंगेश पाटील, श्री. महाडिक, ग्रुप ग्रामपंचायत गोवे येथील सरपंच महेंद्र पोटफोडे, उपसरपंच सुमित गायकवाड, सदस्य नितीन जाधव, नरेंद्र पवार उपस्थित होते. गोवे आदिवासी वाडीतील महिला राणी अरविंद पवार हिने व गोवेवाडीतील ग्रामस्थांनी सेंटर फॉर सोशल ॲक्शन व जीवनधारा संस्था कोलाड यांचे आभार मानले.









## नागोठण्यांच्या बँक ऑफ इंडिया शाखेच्या प्रवेशद्वारावर घाणीचे साम्राज्य शाखाधिकारींचे दुर्लक्ष

नागोठणे :- नारायण म्हात्रे

बँक ऑफ इंडिया शाखा नागोठणे येथील प्रवेशद्वारावर व ए टी एम दरवाज्याजवळ घाणीचे साम्राज्य पसरले असून सदर बँकेच्या शाखेत असणा-या शाखाधिकारी बाईचे दुर्लक्ष दिसून येत आहे.ङ्ग या बँकेत मोठमोठे खातेदार आहेत. व इथे अनेकजण येत असताना पाऊल कुठे टाकावे हा प्रश्न पडत असल्याने सदरच्या बँकेच्या प्रवेशद्वारावर चिखल, कुजलेला कचरा अशी घाण दिसून येत असून हा किळसवाणा प्रकार एका राष्ट्रीयकृत बँकेच्या प्रवेशद्वारावर आहे हे जाणीवपूर्वक



दुर्लक्ष केल्याचे उदाहरण आहे. कारण देशात जर संपूर्णपणे स्वच्छता अभियान राबविला जात असताना या बँकेच्या अधिकारी अनभिज्ञ कशा राहू शकतात हे न सुटणारे कोडे आहे आणि हा सगळा चिखल शेजारी होत असलेली भव्य इमारतीचा असून त्या ठेकेदाराने सुध्दा दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे, कारण त्यांच्या तुटक्या फुटक्या विटांचा चुरा, सिमेंटचे पाणी, माती दगडगोटे यांचा असून बँकेचे अधिकारी मुग गिळून गप्प का? गेल्या महीनाभरात पावसाने उच्चांक गाठला असून या घाणीने तिथे असणारी छोटेमोठे दुकानदार यांना दुर्गंधीला सामोरे जावून तो घाण वास सहन करावा लागत आहे. तसेच याच मार्गावर अनेक सरकारी निमसरकारी कार्यालये प्राथमिक आरोग्य केंद्र हाकेच्या अंतरावर आहे

व या रस्त्यावर नेहमीच लोकांची गर्दी पहायला मिळते तेव्हा हा कचरा त्वरित उचलावा अशी प्रमुख मागणी ग्राहकांकडून केली जात आहे. तसेच याच बँकेचे ए टी एम शेजारी असून इथे सुध्दा घाणीचे साम्राज्य पसरले असून ए टी एम चा प्रवेशद्वार साफ कधी होणार? हा देखील मोठा गौण प्रश्न आहे. याठिकाणी ग्रामपंचायतच्या नाल्यातून पाणी रस्त्यावर आले असून नालेसफाई न झाल्याने सर्वत्र घाणीचे साम्राज्य दिसून आले आहे. तसेच महावितरणने उन्हाळ्यात झाडाच्या छाटलेल्या फांद्या न काढल्याने गटार घाणीने भरलेले आहे त्यामुळे ते घाण पाणी रस्त्यावर जाणारे वाहनांमुळे पायी ये जा करणा-या लोकांच्या अंगावर उडत आहे. एकंदरीत सगळेच अबोलं असल्यामुळे ही घाण साफसफाई करणारे कर्मचारी यांच्या नजरेत कशी आली नाही याचे आश्चर्य वाटत आहे.

## पळसदरी येथे निबंध स्पर्धा अणि वक्तृत्व स्पर्धा संपन्न

कर्जत -:जयेश जाधव

पळसदरी ग्रामपंचायत हद्दीतिल सर्व शाळांमध्ये राजमाता जिजाऊ फाऊंडेशन तर्फे लोकमान्य टिळकांच्या पुण्यतिथी निमित्त व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती निमित्त निबंध स्पर्धा अणि वक्तृत्व स्पर्धा चे आयोजन करण्यात आले होतेङ्ग सदर कार्यक्रमास राजमाता जिजाऊ फाऊंडेशन च्या अध्यक्षा ॲड. पुजाताई सुर्वे अणि त्यांच्या समवेत सहकारी सदस्या सुवर्णा ताई सुर्वे,उपस्थित होत्या तसेच मा. पुजाताई सुर्वे यांनी मुलांना अणि मुलींना मार्गदर्शन केले त्यांचे योगदाना बद्दल माहिती दिली तसेच भाषण अणि निबंध स्पर्धा मधील विजेते मुला मुलींना रोख रक्कम बक्षीस अणि प्रशस्तीपत्रक दिले तसेच पळसदरी ठकुरवाडी शाळे तील सर्व विद्यार्थ्यांना वहया वाटप केले. शाळांमधील शिक्षक आणि शिक्षिका यांनी राजमाता जिजाऊ फाऊंडेशन च्या स्तुत्य उपक्रम बाबत कौतुक अणि अभिनंदन केले





## बंदी असतानाही अवजड वाहनांची वाहतूक सुरूच; सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

*अलिबाग प्रतिनिधी राजेश बाष्टे*

*सर्वाधिक वर्दळ असलेला पाल्हे बायपासवरील पाल्हे पूल कमकुवत झाला असून, मागील महिन्यात पुलाच्या बाजूचा काही भाग खचला होता. यामुळे पुलावरुन अवजड वाहनांची वाहतूक बंद करण्यात आली आहे. याबाबतचे सूचना फलक लावण्याने आले असले तरी अजूनही अवजड वाहतूक सुरू आहे. त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाले आहे. यामुळे पाल्हे पूल कोसळून मोठा अपघात होण्याची शक्यता आहे.*

भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )